(174)

ISSN:-234

# जिल्हा परिषद नेतृत्वाचा तुलानात्मक अभ्यास विशेष संदर्भ :- हिमायतनगर तालुक्यातील जि.प.सदस्य. (शेख रिहाना शेख चांद, माझळकर गोपाबाई देवजी, सुभाष आला राठोड )

**पंजाब चव्हाण , डोंगरे एल. बी.**

डि.बी. कॉलेज, भोकर जि. नांदेड .
राज्यशास्त्र विभाग प्रमुख , हु.ज.पा. महाविद्यालय, हि.नगर जि. नांदेड.

***सारांश:***

स्थानिक स्वराज्य संस्था या भारतीय लोकशाहीचा पाया आहे. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया ब्रिटिश अधिकारी लॉर्ड रिपन याने घातला. म्हणुन त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थाचा जनक म्हणतात. प्राचीन काळापासून भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेच अस्तित्व दिसून येते. भारतािल स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्रोत्तर काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास झालेला दिसून येतो.

**प्रस्तावना :-**

भारताने लोकशाही शासन पद्धतीचा अंगीकार केला. ग्रामधिष्ठित लोकशाही निर्माण करण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी पंचायत राज व्यवस्था निर्माण केली. ग्रामीण भागाचा सर्वांग विकास करण्यासाठी स्थानिक नेतृत्वाची जडणघडन करुन लोकशाही प्रक्रियेत ग्रामीण भागातील लोकांचा सक्रिय सहभाग निर्माण करुन त्यांच्या मार्फत ग्रामीण भागाच्या सर्वांग विकासाची जबाबदारी ग्रामीण जनतेवर सोपविण्यात आली.

**पंचायत राज व्यवस्थेचा उदय आणि विकास :-**

1884 ला मुंबई लोकल बोर्डाची स्थापना करण्यात आली. भारत सरकारच्या 1935 च्या कायदयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्यात आली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर महात्मा गांधी प्रणित ग्रामधिष्ठित लोकशाही निर्माण करण्यासाठी घटनाकारांनी त्याला घटनेच्या माध्यमातून मुर्त रुप दिले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 40 नुसार राज्य हे ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासाठी कार्यप्रवण होईल आणि त्यांना स्वराज्याचे मुलभूत घटक म्हणुन कार्यप्रवण होण्यासाठी योग्य ते अधिकार व शक्ती प्रदान करील . 26 जानेवारी 1950 रोजी भारत स्वातंत्र्य सार्वभौम राष्ट्र म्हणुन पुढे आला. पारतंत्र्यातून मुक्त झाल्यानंतर विकासाची घडी बसविण्याचे प्रयत्न केले. भारताच्या विकासाच्या योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू झाली. लोकशाहीवादी भारताने लोकशाहीचे पाळेमुळे अधिक मजबूत करुन ग्रामीण विकासाची धुरा लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यासाठी 16 जानेवारी 1957 रोजी बलवंतराय मेहता समिती स्थापन करण्यात आली. या समितीने 24 नोव्हेंबर 1957 रोजी आपल्या शिफारशी भारत सरकारला सादर केल्या. बलवंतराय मेहता समितीने आपल्या शिफारशीत लोकशाही विकेंद्रीकरण आणि सामुदायिक विकास कामे यशस्वी करण्यासाठी पंचायत राज्याची स्थापना करुन त्यांना पर्याप्त अधिकार देणे आवश्यक आहे. स्थानिक जनतेच्या मनात आस्था निर्माण करण्यासाठी आणि त्यामध्ये जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्यन करण्याची नितांत गरज आहे. समाज विकास कार्यक्रमात नवा जोम उत्साह निर्माण करण्यासाठी समाज विकास योजना ही जनतेच्या विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक जनतेच्या प्रतिनिधीक स्वराज्याच्या लोकशाही यांच्याकडे सोपविण्यात आली. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीच्या माध्यमातून केंद्रित लोकशाही विकेंद्रीकरण करुन त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था निर्माण करण्यात आली. आहे. तरतुद आहे. महाराष्ट्रात 1 मे 1962 पासून जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 8 / March 2014
ISSN:-2347-2723

जिल्हा परिषदेची सदस्य संख्या कमीत कमी 50 ते जास्तीत जास्त 75 असते. साधारणतः 35 हजार लोकसंख्येचा एक प्रतिनिधी निवडला जातो. जिल्हा परिषद सदस्यांची निवड प्रौढ मतदान पध्दतीने केली जाते. जिल्हा परिषदेची निवडणुक राज्य निवडणुक आयोगाकडून पार पाडली जाते. जिल्हा परिषद सदस्यांचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो. जिल्हा परिषदेत एक अध्यक्ष आणि एक उपाध्यक्ष असतो. राज्य शासन व जिल्हा परिषद यांच्यातील दुवा म्हणुन कामे करण्यासाठी आणि शासनाच्या योजना त्यांची अंमलबजावणी व पैशांचा योग्य खर्च जिल्हा परिषदेच्या प्रशासनाला नियमीत ठेवण्यासाठी एक मुख्यकार्यकारी अधिकारी असतो.

नांदेड जिल्हा परिषदेत निवडणूक फेब्रुवारी 2012 रोजी संपन्न झाली. त्यामध्ये हिमायतनगर तालुक्यातून तीन सदस्य प्रतिनिधीत्व करतात. त्यामध्ये एक खुला महिला, एक अनुसूचित जमाती व एक इतर मागांस वर्गीय यांसाठी आरक्षित होते. हिमायतनगर जिल्हा परिषद गट हे महिला खुला संवर्गासाठी आरक्षित होता. त्यामध्ये काँग्रेसच्या शेख रिहाना बेगम शेख चांद यांचा विजय 3891 मतांनी झाल्या.

कामारी जि.प.गट अनुसूचित जमाती महिला साठी आरक्षित होता. सदर गटातून अनुसूचित जमातीच्या 4 महिला उमेदवार निवडणुक रिंगणात होत्या. यामध्ये काँग्रेसच्या माझळकर गोपाबाई देवजी यांचा 7311 मतांनी विजय झाल्या.

जि.प.सरसम गट इतर मागास वर्ग पुरूषा करीता आरक्षित होता. या गटातून एकुण 3 उमेदवार निवडणुक रिंगणात होते. त्यामध्ये काँग्रेसचे राठोड सुभाष आला यांना 6387 मते मिळून त्यांचा विजय झाला.

**संशोधन विषयाचे महत्व :-**

जि.प.सदस्यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ :- शेख रिहाना बेगम शेख चांद, सुभाष आला राठोड आणि माझळकर गोपाबाई देवजी हिमायतनगर तालुका हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून लोकशाही राजकिय व्यवस्था अधिक सक्षम गतिमान लोकाभिमुख करण्यासाठी ग्रामीण विकासाची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर सोपविण्यात आली आहे. ग्रामीण नेतृत्व हे आपल्या कार्याच्या माध्यमातून राष्ट्रीय राजकारणात आपल्या नेतृत्वाचा चांगला ठसा उमटवला आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून नेतृत्वाची जडणघडण होते. हे नेतृत्व राष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव निर्माण करते. म्हणुन कोणतेही नेतृत्व जन्मजात असत नाही तर त्यांना वेगवेगळया घटकाच्या माध्यमातून आपल्या नेतृत्वाचा विकास करावा लागतो. स्थानिक नेतृत्वाच्या विकासाचा अभ्यास यामध्ये अंर्तभुत असल्याने या विषयाचे महत्व आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1)जि.प.सदस्य आपल्या कर्तव्याप्रती जबाबदार आहेत का ? हे अभ्यासणे.
2)जि.प.सदस्यांच्या विकास कामांचा अभ्यास करणे.
3)जि.प.सदस्यांच्या नेतृत्वाच्या जडणघडणीचा अभ्यास करणे.
4)जि.प.सदस्यांच्या कार्यात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
5)जि.प.सदस्य आणि जनता यांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन लेखात प्राथमिक आणि व्दितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात आला.

**गृहितके :-**

1)जि.प.सदस्य आपल्या कर्तव्याप्रती जबाबदार आहेत.
2)जि.प.सदस्यांना विकास कामासाठी निधी अपूरा पडतो.
3)जि.प.सदस्यांचा नेतृत्वाचा विकास होतो.
4)जि.प.सदस्यांना विकास योजना कामे करतांना प्रशासकीय अडचणी येतात.
5)जि.प.सदस्य आणि जनता यांचे संबंध समन्वयाचे आहेत.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 8 / March 2014 ISSN:-2347-2723

**संशोधनाची मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन लेखात हिमायतनगर तालुक्यातील एकुण तीन सदस्य आहेत. त्यापैकी दोन महिला आणि एक पुरूष नेतृत्वाचा अभ्यास करावयाचा आहे.

**जि.प.सदस्यांची राजकीय पार्श्वभूमी दर्शविणारा तक्ता :-**

भारताने लोकशाही शासन पध्दतीचा अंगीकार केल्याने राजकारण ही कुण्या एका जाती धर्माची, वंशाची, लिंगाची मक्तेदारी राहिली नाही तर राजकारण हे व्यासपीठ सर्वांसाठी खुले झाले. हिमायतनगर तालुक्यातील जि.प.सदस्यांची राजकिय पार्श्वभूमी प्रत्यक्षात मुलाखतीव्दारे माहिती संकलीत करण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील तक्त्यात करण्यात आले आहे.

**जि.प.सदस्यांची राजकिय पार्श्वभूमी दर्शविणारा तक्ता क्रमांक 01**

| अ.क्र. | राजकिय पार्श्वभूमी आहे | राजकिय पार्श्वभूमी नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | -- | -- | -- |
| 02 | 01 | -- | 02 | 66.66 |
| 03 | -- | 01 | 01 | 33.33 |

जि.प.सदस्यांच्या राजकिय पार्श्वभूमी आहे की नाही याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, एका जि.प.सदस्यास राजकिय पार्श्वभूमी असल्याचे दिसून येत नाही तर दुसऱ्या दोन सदस्यांना राजकिय पार्श्वभूमी असल्याचे दिसून येते.

**हिमायतनगर तालुक्यातून जि.प.राजकिय पक्षाचे सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता क्रमांक 02**

| अ.क्र. | काँग्रेस | राष्ट्रवादी | भा.ज.प. | शिवसेना | अपक्ष | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | - | | - | -- | -- | -- |
| 02 | 01 | - | | - | -- | -- | -- |
| 03 | 01 | -- | -- | -- | -- | 03 | 100 |

हिमायतनगर तालुक्यातून तीन नांदेड जि.प.सदस्य नेतृत्व करतात. त्यामध्ये कोणत्या राजकिय पक्षाचा प्रभाव दिसून येतो याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, तिन्ही सदस्य काँग्रेस या पक्षाचे आहेत. इतर पक्षाचा एकही सदस्य दिसून येत नाही. अर्थात हिमायतनगर तालुक्यात काँग्रेस पक्षाचा प्रभाव सर्वाधिक दिसून येतो.

**जि.प.सदस्यांनी निवडणुकित वापरलेली प्रचारयंत्रणा दर्शक तक्ता क्रमांक 03**

| अ.क्र. | जात | पैसा | धर्म | पक्ष | % |
|---|---|---|---|---|---|
| 01 | - | - | - | 01 | 01 |
| 02 | - | - | - | 01 | 02 |
| 03 | - | - | - | 01 | 100 |

जि.प.सदस्य निवडणुकीत निवडुन येण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर केला याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, निवडणुकीत सर्व सदस्यांनी जात, पैसा, धर्म या साधनांऐवजी पक्षामुळे निवडून आल्याचे स्पष्ट दिसून येते.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 8 / March 2014
ISSN:-2347-2723

**निवडणुकित राजकिय पक्षाचे महत्व माननारे जि.प.सदस्यांची संख्या दर्शक**
**तक्ता क्रमांक 04**

| अ.क्र. | राजकिय पक्षाला मानता ? | होय राजकिय पक्षाला मानता ? नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | - | - | - |
| 01 | 01 | - | — | - |
| 03 | 01 | - | 03 | 100 |

हिमायतनगर तालुक्यातील जि.प.सदस्य राजकिय पक्षाचे महत्व मानता काय ? होय / नाही हे अभ्यासल्यानंतर हे स्पष्ट होते की, सर्व जि.प.सदस्य हे निवडणुकीच्या राजकारणात राजकिय पक्षाला माननारे 100% असल्याचे दिसून येते.

**जि.प.सदस्य आपल्या सत्तेचा वापर कोणत्या घटकासाठी करतात याची माहिती दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 05**

| अ.क्र. | सत्तेचा वापर जनकल्याणासाठी करणारे जि.प.सदस्य | सत्तेचा वापर स्वत:साठीकरणारे जि.प.सदस्य | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | - | - | - |
| 02 | 01 | - | | |
| 03 | 01 | - | 03 | 100 |

हिमायतनगर तालुक्यातील जि.प.सदस्य आपल्या सत्तेचा वापर जनकल्याणासाठी करतात किंवा स्वत:साठी करतात याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, जि.प.सदस्य हे आपल्या सत्तेचा वापर स्वत:साठी न करता जनकल्याणासाठी करतात हे दिसून येते.

**जि.प.सदस्यांच्या राजकारणाचा प्रमुख आधार दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 06**

| अ.क्र. | जात | पैसा | पक्ष | कार्य | % |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 33.33 |
| 01 | 01 | - | - | - | - |
| 02 | - | 01 | — | - | 66.66 |
| 03 | - | 01 | - | - | |

जि.प.सदस्य निवडणुकीत निवडून येण्यासाठी कोणता प्रमुख आधार आहे याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की,33.33% सदस्यांच्या राजकारणात जातीचा आधार आहे.तर 66.66% सदस्य निवडणुकीत पैशाला महत्व देतात हे स्पष्ट होते.

**जि.प.सदस्यांना उमेदवारी प्राप्तीचा मार्ग दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 07**

| अ.क्र. | नेता | जात | आपले कार्य | पैसा | इतर | % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 01 | - | - | - |
| 01 | - | - | 01 | -- | - | - |
| 02 | - | - | 01 | - | - | 100 |
| 03 | - | - | | | | |

178

ISSN:-2347-2723

जि.प.सदस्य निवडणुकीत सदस्यांना निवडणूका लढविण्यासाठी पक्षाकडून उमेदवारी मिळवतांना कोणता मार्ग प्रभावी ठरतो याचा अभ्यास केल्यानंतर सर्वच उमेदवारांना आपल्या कार्यामुळे पक्षाने उमेदवारी दिलीअसल्याचे दिसून येते. म्हणून निवडणुकीत उमेदवारी मिळवितांना जात, नेता, पैसा याशिवाय पक्षात उल्लेखनिय कामे करणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाची उमेदवारी दिली जाते असे दिसून येते.

**निवडणुकीत निवडून येण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो होय / नाही यांची संख्या दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 08**

| अ.क्र. | पैसा खर्च करावा लागतो होय | पैसा खर्च करावा लागतो नाही | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | 01 | - | - | - |
| 02 | 01 | - | - | 66.66 |
| 03 | - | - | 01 | 33.33 |

हिमायतनगर तालुक्यातील जि.प.सदस्यांना निवडणुकीत खर्च केला आहे नाही याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, 66.66% उमेदवारांनी निवडणुकीत पैसा खर्च केल्याचे दिसून आले तर 33.33% उमेदवारांनी निवडणुकीत पैसा खर्च केला नसल्याचे दिसून येते.

**जि.प.योजना लोकांपर्यंत पोहचतात काय ? याची माहिती दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 09**

| अ.क्र. | जि.प.योजना लोकांपर्यंत पोहचतात होय | जि.प.योजना लोकांपर्यंत पोहचतात नाही | % |
|---|---|---|---|
| 01 | 01 | - | - |
| 02 | 01 | - | - |
| 03 | 01 | - | 100 |

जि.प.च्या कल्याणकारी योजना सामान्य लोकांपर्यंत पोहचतात काय ? याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, 100% सदस्यांच्या मते जि.प.कल्याणकारी सर्व योजना सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचतात असे दिसून येते.

**जि.प.अधिकारी विकास कामासाठी लाच मागतात काय ? माहिती दर्शविणारा**
**तक्ता क्रमांक 10**

| अ.क्र. | लाच मागतात होय | लाच मागत नाहीत | एकुण | % |
|---|---|---|---|---|
| 01 | - | 01 | - | - |
| 02 | - | 01 | - | - |
| 03 | - | 01 | 03 | 100 |

जि.प.सदस्यांना आपल्या गटातील विकास कामे करण्यासाठी कल्याणकारी योजनांचा निधी मंजूर करुन आणतांना जि.प.अधिकारी पैसा/लाच मागतात काय ? याचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, 100% सदस्यांच्या मते जि.प.अधिकारी लाच मागत नाहीत हे दिसून येते.

Reviews of Literature
Volume 1 , Issue 8 / March 2014
ISSN:-2347-2723

**निष्कर्ष :-**

हिमायतनगर तालुक्यातील तीन जिल्हा परिषद गटातील सदस्यांच्या नेतृत्वाचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नेतृत्वाची जडणघडणीचा, त्याचा कार्याचा, राजकिय पार्श्वभूमीचा, राजकिय आधाराचा, राजकिय पक्षांच्या प्रभावाचा अशा विविध घटकांचा अभ्यास करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्था मुख्य हेतू लोकशाहीचे विकेंद्रीकरण करुन ग्रामीण विकासाची जैबाबदारी स्थानिक प्रतिनिधीकडे सोपवून त्यांची निवड ग्रामीण जनतेच्या माध्यमातून व्हावी हा पंचायत राज व्यवस्थेचा मुख्य हेतू होता. हा हेतू साध्य करण्यासाठी भारत सरकारने आणि महाराष्ट्र शासनाने विविध समित्या आणि 73 व्या घटना दुरूस्तीने पंचायत राज व्यवस्था अधिक सक्षम, गतीमान, लोकाभिमुख करण्यांत आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेमध्ये राजकिय जागरुकता, राजकिय सहभाग, लोकशाहीच्या राजकारणाचे विकेंद्रीकरण, स्थानिक गरजा लक्षात घेऊन विकास होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याच्या पाठशाळा ठरत आहेत. अनेक प्रतिनिधी आपल्या नेतृत्वाच्या परिपक्वतेतून महाराष्ट्राच्या विधानसभेत आणि भारताच्या लोकसभेत आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवतांना दिसून येत आहे. म्हणुन सक्षम लोकाभिमुख, जाणकार, कुशल नेतृत्व निर्माण होत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :-**


| अ.क्रं. | ग्रंथाचे नांव | लेखकाचे नांव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र शासन आणि राजकारण | डॉ.विठ्ठल मोरे | अरुणा प्रकाशन, लातूर |
| 2. | Rural Leadershi Emerging Trends | ए.एस.मलिक | दिप प्रकाशन, नवी दिल्ली |
| 3. | पंचायती राज्य व्यवस्था | डॉ.निशांत सिंह | राधा प्रकाशन, नवी दिल्ली |
| 4. | महाराष्ट्र शासन आणि राजकारण | डॉ.अशोक नाईकवाडे | कैला प्रकाशन, औरंगाबाद |
| 5. | पंचायत राज आणि महिला नेतृत्व | डॉ.पंजाब चव्हाण | लोकविद्या प्रकशन, परभणी |
| 6. | जिल्हा परिषद निवडणुक निकाल 2012 | तहसील कार्यालय, हि.नगर | |
| 7. | जि.प.सदस्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती | | |


डॉ.शेख शहनाज अहमद
हिंदी विभाग
सहा.प्राध्यापक एवं शोधनिर्देशक
हु.ज.पा.महाविद्यालय हिमायतनगर